# आकाशवाणी पुणे

# प्रादेशिक वृत्त विभाग

# पुणे वृत्तांत

# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-14.04.2026** **वार- मंगळवार**

---

**भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती**

भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची 135 वी जयंती आज सर्वत्र विविध उपक्रम, संकल्प यांच्यासह उत्साहात साजरी केली आहे.

केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आज पुणे रेल्वे स्थानकाजवळील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकास भेट देऊन अभिवादन केलं.

भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा मंत्र केवळ घोषणांपुरता मर्यादित न ठेवता, तो प्रत्यक्ष सामाजिक प्रगतीसाठी अंमलात आणणे आवश्यक आहे. आजच्या काळात केवळ स्मारके किंवा फ्लेक्स लावण्यापेक्षा समाजातील तरुण पिढीला, विशेषतः विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आणि उद्योगासाठी प्रत्यक्ष मदत करणे हीच महामानवाला खरी आदरांजली ठरेल, असं प्रतिपादन राज्याच्या सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाच्या राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी केलं. सामाजिक न्याय विभाग, समाज कल्याण विभाग, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या कार्यक्रमात तसंच सामाजिक समता सप्ताहाच्या समारोपप्रसंगी त्या बोलत होत्या.
कार्यक्रमापूर्वी मिसाळ यांनी जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. पुणे शहराच्या महापौर मंजुषा नागपुरे यावेळी उपस्थित होत्या.

भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला समता, स्वातंत्र्य आणि न्यायाचा विचार हा आपल्या संविधानाचा पाया आहे. त्यांनी दिलेल्या शिक्षण, संघटन आणि संघर्षाच्या मंत्रामुळे समाजात परिवर्तन घडलं. आजच्या पिढीने त्यांच्या विचारांना केवळ स्मरणात न ठेवता आचरणात आणणे ही काळाची गरज आहे, असं प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केलं. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीनं पिंपरीतल्या मुख्य प्रशासकीय इमारतीमधील डॉक्टर आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला, त्यावेळी महापौर बोलत होते.

जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी आणि पुणे महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनीही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

पिंपरी इथल्या भीमसृष्टी परिसरातल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यावर एकता कर्मचारी संघटनेच्या वतीनं हेलिकॉप्टरच्या माध्यमातून पुष्पवृष्टी करण्यात आली.

शिक्षणाची आवड आहे; परंतु घरातली आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे शिक्षणापासून वंचित असणाऱ्या महिलांना शिक्षणासाठी आधार देण्याचा निर्णय पुण्यातल्या एरंडवणे भागातल्या गणेश मंडळांनी घेतला आहे. या उपक्रमाचा शुभारंभ डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या पूर्वसंध्येला झाला. शिक्षणाची आवड असूनही शिक्षण घेऊ न शकलेल्या 30 ते 75 वर्षे वयोगटातील महिलांसाठी हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

**<u>मेधा कुलकर्णी</u>**

नारी शक्ती वंदन विधेयकाला सर्व पक्षांनी पाठिंबा द्यावा, असं आवाहन राज्यसभा खासदार मेधा कुलकर्णी यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत केलं. महिलांना समान संधी देत देशाच्या विकासात त्यांचा सहभाग वाढवणं हे या विधेयकाचं मुख्य उद्दिष्ट असल्याचं त्यांनी नमूद केलं. महिलांच्या सक्षमीकरणासाठी केंद्र सरकार विविध महत्त्वपूर्ण निर्णय घेत असून, या विधेयकाद्वारे महिलांना राजकीय प्रतिनिधित्व मिळणार असल्याचं कुलकर्णी यांनी सांगितलं.

**<u>प्रकाशन</u>**

अकरा कवींनी लिहिलेल्या रचनांचा अंतर्भाव असलेल्या 'गुलबक्षी' या वल्लरी प्रकाशनानं प्रसिद्ध केलेल्या प्रातिनिधिक काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा आज पार पडला. मागील 3 वर्षातला हा 22 वा कविता संग्रह असून राज्याच्या विविध भागांतल्या कवींना चांगलं व्यासपीठ निर्माण करून देणं हे आमचं ध्येय असल्याचं वल्लरी प्रकाशना तर्फे सांगण्यात आलं. तर उत्तम काव्याची निर्मिती होण्यासाठी परिश्रम घ्यायला हवेत, मनाची चांगली मशागत व्हायला हवी, असं मत महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या प्रमुख कार्यवाह स्वाती महाळंक यांनी यावेळी बोलताना व्यक्त केलं.

**<u>हवामान</u>**

पुण्यात तापमानाच्या पाऱ्यानं चाळीशी ओलांडली आहे. पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 40 तर किमान तापमान 20 अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्या कमाल तापमान 41 अंशांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज हवामान विभागानं नोंदवला आहे. उन्हाच्या तडाख्यामुळे शहरातले व्यवहार दुपारच्या वेळी मंदावले आहेत. नागरिकांनी उष्माघातापासून वाचण्यासाठी काळजी घेण्याचं आवाहन शासनाकडून केलं जात आहे. राज्याचा आपत्ती व्यवस्थापन विभाग सज्ज ठेवण्यात आला आहे. दिवसा, विशेषत: दुपारी काम बाहेर काम कराव्या लागणाऱ्या सर्वांची विशेष काळजी घ्यावी, असे निर्देश मंत्री गिरीश महाजन यांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.

**तर हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू, संध्याकाळी सहा वाजता विविध भारती पुणे केंद्रावर ताज्या पुणे वृत्तांतसह. नमस्कार.**